!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०९ ०७/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

### वाळुज महानगर परिसरातील नोटीसां दिलेल्या कामगार वस्त्यांना वाचवा खासदार चंद्रकांत खैरे यांची मुख्य प्रशासक सुनिल केद्रेंकर यांच्याकडे मागणी

**संभाजीनगर ( दि ८ )** – कमळापुर, राजणगांव, वळदगाव, वडगांव कोल्हाटी, घाणेगाव तीसगाव या परिसरातील रहिवाशांना सिडकोने दिलेल्या नोटीसमुळे घबराटीचे वातावरण निर्माण झाले असुन त्या गावकऱ्यांचे म्हणणे ऐकूण घेत शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी सिडकाचे मुख्य प्रशासक सुनिल केंद्रेकर यांची भेट घेऊन या परिस्थितीतुन मार्ग काढावा अशी मागणी केली. त्यावर केंद्रेकर यांनी सकारात्मक विचार करुन शेतकऱ्यांच्या व रहिवाशांच्या सहमतीने योग्य निर्णय घेऊ असे आश्वासन दिले.

शेतकरी व कामगार बचाव कृती समितीने शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची शनिवारी भेट घेऊन सिडकोने बजावलेल्या नोटीसांमुळे जवळपास २० हजारांच्या घरांवर होणाऱ्या कारवाईची गंभीर परिस्थिती निदर्नशास आणुन दिली होती. त्या सदंर्भाचे आज सिडकोच्या मुख्य प्रशासकांच्या दालनात या गावकऱ्यांची बैठक खासदार चंद्रकांत खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. २५ वर्षापासुन सिडको प्राधिकरणाची नियुक्ती झाली असुन ही विकास होत नसल्याचे या परिसरात लोकवस्ती झाली, त्यात प्रामुख्याने शेतकरी व कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहेत. या विषयी खासदार चंद्रकांत खैरे यांनी संपूर्ण परिस्थिती मुख्य प्रशासक सुनिल केंद्रेकर यांच्या निदर्शनास आणुन दिली. सुनिल केंद्रेकर यांनी सरपंच व ग्रामसेवकांना यापुढे कुठलेही लेआऊट टाकु देऊ नका व आलेल्या नोटींसाना उत्तर द्या. या विषयी गांभीर्याने लक्ष देऊन तोडगा काढण्यावर माझा भर राहील तो पर्यंत कुठलेही बांधकाम या भागात खपवून घेतले जाणार नाही. या भागात परवानगी नसतांना लोकांना फसवलेल्या भुमाफियांना सोडल्या जाणार नाही त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील असे मुख्य प्रशासक केंद्रेकर यांनी स्पष्ट केले.

साडे सहाशे कोटी रुपये ग्रोथसेंटर डेव्हलपमेंट व इतर सोयी सुविधेसाठी सिडको खर्च करणार आहे. शिवाय नगर ३ च्या विकासासाठी आता शेतकऱ्यांचा पुढाकार असुन मागच्याचुका टाळून नागरिकांच्या सहमतीने त्याचा विकास करणार असल्याचेही केंद्रेकर म्हणाले तिसगावंचे सरपंच रामचंद्र कसुरे यांनी तिसगावचा रस्ता पुर्वी सिडकोने केला असल्याने आता कुठलेही डिपार्टमेंट तो रस्ता बनवण्यास तयार नसल्याने गावकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत असल्याचे निदर्शनास आणुन दिले. तर कचरा डेपो सोडून इतर कुठल्याही प्रकल्पासाठी जमीन देण्यास तयार असल्याचे उपसरपंच विष्णु जाधव यांनी सांगितले.

वडगाव कोल्हाटी, राजणगांवच्या कामगारांच्या वस्त्यांचा प्रश्न प्राधान्याने हाताळण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित दिल्या सुमारे ६०० ते ७०० हेक्टरचा हा प्रश्न असुन बहुतांश सिडको एमआयडीसीकडे हॅण्डओव्हर करणार असल्याचे अनेकांचा प्रश्न सुटणार आहे. बाकी लोकांसाठीही नवीन डिपी प्लॉन बनवण्यासाठी प्रयत्न सुरु असुन वस्त्या या येलो झोन बनवण्यासाठी प्रयत्न राहील या परिसरातुन सिडको हटवल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे नव्या जमीन अधिग्रहण नियमानुसार शेतकऱ्यांना मिळणारा लाभ जास्त असले शिवाय शेतकऱ्यांना परत मिळणारे प्लॉट जास्तीत जास्त रस्त्यावर देण्याचा आमचा प्रयत्न असणार असल्याचे सिडको मुख्य प्रशासन सुनिल केंद्रेकर यांनी सांगितले. बैठकित सकारात्मक पाऊले उचलणार असल्याचे संकेत मिळाल्याने कृषी समिती व या भागातील गावकऱ्यांनी खासदार चंद्रकांत खैरे यांचे आभार मानले.

या बैठकिस सिडको प्रशासन अरगुंडे, सहा नियोजनकार बोलखंडे, माधव सुर्यवंशी, तहसिलदार विद्या मुंडे, तिसगावंचे सरपंच रामचंद्र कसुरे, उपसरपंच विष्णु जाधव, काकासाहेब बुट्टे, विजय साळे, शेतकरी व कामगार बचाव कृती समितीचे योगेश दळवी, शेषराव गायके, दत्तु हिवाळे, सुरेश फसाटे, विश्वनाथ स्वामी, आत्माराम आगलावे, तुकाराम जाधव, दलसिंग काबरा, किशोर राका, सोमिनाथ काळे, साहेबराव घोडके, राजकुमार रेड्डी, अरुण शेरे, गोविंद सोलपुरे, संजय दुबीले, कमल पाटणी, कृष्णा पवार, किशोर मस्के आदिंसह गावकरी उपस्थित होते.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन/ गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525